सकाळ



चंदगड : श्रीमती तुळसा आवडण यांना मदतीचा धनादेश देताना पुष्पा नेसरीकर. शेजारी संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले व इतर.

# मृत सभासदाच्या वारसास 'रवळनाथ'तर्फे आर्थिक मदत

चंदगड : रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटी आजराच्या येथील शाखेचे दिवंगत सभासद गोविंद रुकमाना आवडण (रा. हलकर्णी) यांच्या पत्नी श्रीमती तुळसा आवडण यांना एक लाख पाच हजार रुपयांची मदत करण्यात आली. संस्थेच्या सभासद कल्याण निधीतून हे आर्थिक सहकार्य देण्यात आले. येथील शाखेच्या अध्यक्षा पुष्पा नेसरीकर यांच्या हस्ते निधीचा धनादेश आवडण यांच्याकडे सुपूर्त करण्यात आला. या वेळी संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले, संचालक प्रा. डॉ. दत्ता पाटील, शाखा सल्लागार प्रा. डॉ. राजाराम साळुंखे, रामचंद्र देशपांडे, सीईओ डी. के. मायदेव, शाखाधिकारी दीपक शिंदे उपस्थित होते.

Kolhapur, Gadhinglaj-Today
14/04/2021 Page No. 3

# ‘रवळनाथ’तर्फे मयत सभासदांच्या वारसास लाखाची मदत




**चंदगड : तुळसा आवडण यांच्याकडे मदतीचा धनादेश देताना शाखा चेअरमन पुष्पा नेसरीकर. शेजारी संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले व इतर.**

प्रतिनिधी
**चंदगड**

चंदगड येथील रवळनाथ को-ऑप. हौसिंग फायनान्स सोसायटीतर्फे मयत सभासदाच्या वारसास संस्था सभासद कल्याण निधीतून आर्थिक सहाय्य करण्यात आले.

गोविंद रुक्माण्णा आवडण (रा. हलकर्णी ता. चंदगड) या सभासदाचे निधन झाले. त्यामुळे त्यांच्या वारस पत्नी श्रीमती तुळसा गोविंद आवडण यांच्याकडे सभासद कल्याण निधीमधून संस्थेतर्फे १ लाख ५ हजाराची मदत देण्यात आली. येथील चंदगड शाखेच्या चेअरमन पुष्पा नेसरीकर यांच्या हस्ते मदतीचा धनादेश प्रदान करण्यात आला. यावेळी रवळनाथचे संस्थापक अध्यक्ष एम. एल. चौगुले, संचालक प्रा. डॉ. दत्ता पाटील, शाखा सल्लागार प्रा. डॉ. राजाराम साळुंखे, रामचंद्र देशपांडे तसेच संस्थेचे सीईओ डी. के. मायदेव, शाखाधिकारी दीपक शिंदे उपस्थित होते.